महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४९

# महाराजा सयाजीराव आणि शेती विकास

देवदत्त कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४९

# महाराजा सयाजीराव आणि शेती विकास

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि शेती विकास
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ६९
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम,
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूल
समोर, नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर. - ४१६१११३
मो. ८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# शेती विकास

प्राचीन काळापासून भारत हा कृषिप्रधान देश राहिला आहे. 'धर्म आहे ज्या कुळाचा दो करांनी देत जावे। शिवाराची होत सुगी पाखरांना तोषवावे।।' असा जयघोष करणारा भारतीय शेतकरी समाजाचे 'पालनपोषण' करण्यासाठी नेहमीच आपल्या शेतात राबला. मात्र विषमतावादी भारतीय समाजाने आपल्या शेतात जीवापाड कष्ट करणाऱ्या या शेतकऱ्यांचे सातत्याने शोषण केले. तर त्याचवेळी भारतीय संस्कृतीने जनतेच्या उदरनिर्वाहाचा 'भार' वाहणाऱ्या शेतकऱ्याला 'बळीराजा' असे संबोधले. अशा या शोषित 'बळीराजा'च्या सन्मानार्थ भारताचे पाचवे पंतप्रधान आणि शेतकरी नेते चौधरी चरण सिंग यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस 'किसान दिन' म्हणून साजरा केला जातो. आज भारतीय कृषी क्षेत्र संकटात सापडले असताना बडोद्याच्या महाराजा सयाजीरावांनी शेतकऱ्यांच्या शाश्वत उत्कर्षासाठी राबवलेले कृषी धोरणाचे चिंतन अधिकच अपरिहार्य ठरते.

## सयाजीराव आणि कृषिविषयक उच्चशिक्षण

शेतकऱ्यांमधील निरक्षरता हे त्यांच्या आजवरच्या अधोगतीचे प्रमुख कारण आहे. त्यामुळेच सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत बडोद्यातील शेतकऱ्यांना कृषिविषयक अद्ययावत ज्ञान देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. शेतीसंबंधीचे आधुनिक ज्ञान मिळवण्यासाठी महाराजांनी अनेक होतकरू विद्यार्थ्यांना सरकारच्या वतीने शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. उच्चशिक्षित विद्यार्थी परदेशातून परतल्यानंतर त्यांच्या ज्ञानाचा संस्थानाला फायदा व्हावा यासाठी त्यांना बडोद्यात काही काळ नोकरी करणे सयाजीरावांनी बंधनकारक केले. याच योजनेचा लाभ घेत १८८४ मध्ये खासेराव जाधव सयाजीरावांचे लहान बंधू संपतराव यांच्याबरोबर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालयात पदविका शिक्षण घेतले. शेतकऱ्यांना शेतीचे परिपूर्ण ज्ञान देण्यासाठी आतुर झालेल्या सयाजीरावांनी ‘आपण बडोद्यात कृषी विद्यालय स्थापन करत असून डिप्लोमाचे शिक्षण संपल्यानंतर लगेचच भारतात परतण्याची सूचना’ खासेरावांना २२ नोव्हेंबर १८८६ रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे केली. त्यानुसार आपले उच्च शिक्षण पूर्ण करून १८९० मध्ये खासेराव बडोद्यात परतले. बडोद्यात परतल्यानंतर खासेरावांनी शेतीमध्ये अत्याधुनिक परदेशी तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन दिले. शेती नांगरण्यासाठी जर्मनीहून ट्रॅक्टर मागवण्यात खासेरावांनी

महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच शेताला पाणी देण्यासाठी विहिरीवर ऑईल इंजिन बसवले. परिणामी सयाजीरावांनी १८९७ मध्ये खासेरावांच्याच नेतृत्वाखाली बडोद्यातील स्वतंत्र कृषी खात्याची स्थापना केली.

ऑक्टोबर १९१९ मध्ये सयाजीरावांनी खासेरावांप्रमाणेच रामचंद्रराव माने-पाटील यांना अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व कृषी विषयांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवले. रामचंद्ररावांनी युरोपातील डेन्मार्क, स्वीडन, जर्मनी, नॉर्वे इ. देशांचा प्रवास करून तेथील शेतीची प्रगती, जमीन महसूल पद्धती इ.चे सखोल ज्ञान मिळवले. त्याआधारे त्यांनी 'Consolidation of small and scattered agricultural holding in various countries of Europe' हा चिकित्सक प्रबंध लिहिला. परदेशातून परतल्यानंतर बडोद्यातील जमिनीची तपासणी करत असताना पडीक जमीन लागवडीखाली आणण्याची सूचना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केली. माने-पाटलांच्या प्रयत्नामुळे ६४३ खेड्यांतील ३३,५६४ बिघे जमीन लागवडीखाली आली. त्यामुळे सरकारी तिजोरीत दरवर्षी २६,५६१ रु. ची भर पडू लागली.

वंश परंपरेने जमिनीचे तुकडीकरण झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावर घट होत होती. या पार्श्वभूमीवर त्यावेळच्या पंजाब प्रांतामध्ये लागू करण्यात आलेल्या शेतजमिनी एकत्रीकरणाविषयीच्या कायद्यांच्या

अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी सयाजीरावांनी रामचंद्ररावांना पंजाबमध्ये पाठवले. रामचंद्ररावांनी या अभ्यासावर आधारित 'Land Administration in the Punjab' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. शेतकऱ्यांच्या हितासाठी लागू करण्यात आलेल्या 'Punjab Land Alienation Act' व 'Deccan Agriculture's Relief Act' या कायद्यांचे विश्लेषण करणाऱ्या या ग्रंथाचे अनेक कृषी तज्ज्ञांनी कौतुक केले. पंजाबमध्ये अमलात आलेल्या या कृषिविषयक सुधारणा बडोद्यात लागू करता येतील का याबाबतच्या सूचनादेखील माने-पाटलांनी सदर ग्रंथात नोंदवल्या होत्या. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी संस्थानातील जनतेला साक्षर करतानाच इतर संस्थानातील सुधारणांचा चिकित्सक स्वीकार करण्याची सयाजीरावांची 'गुणग्राहकता' आजही अनुकरणीय आहे.

जाग्प्रवासाने सयाजीरावांना जगातील विविध देशांच्या शेती क्षेत्राची भारतातील शेतीशी तुलना करण्याची संधी मिळाली. त्यातून भारतीय शेतीची मूळ समस्या समजून घेणे महाराजांना शक्य झाले. त्यामुळेच त्यांचे शेती प्रश्नाचे चिंतनसुद्धा वास्तववादी होते. भारतीय शेतीचे आधुनिकीकरण हा भारताच्या आधुनिकीकरणाचा पाया आहे हे त्यांनी जाणले. म्हणूनच ते शेती क्षेत्राच्या विकासात पथदर्शक काम करू शकले. भारतीय शेतीच्या आधुनिकीकरणासंदर्भात त्यांनी वेळोवेळी मांडलेले विचार आजही चिंतनीय आहेत. नोव्हेंबर १९०४

मध्ये कलकत्ता येथे जनतेच्या वतीने देण्यात आलेले मानपत्र स्वीकारताना केलेल्या भाषणात सयाजीरावांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांना शेती आणि उद्योगाचे आंतरशाखीय शिक्षण देण्याची आवश्यकता विशद केली आहे. या भाषणात सयाजीराव म्हणतात, "सध्यापेक्षा चांगली अवजारे तयार करणे व ती चांगल्या रीतीने वापरणे या गोष्टी शेतकरीवर्गाला करता आल्याखेरीज त्या वर्गाची शेतीसंबंधाने सध्या जी हीन कल्पना आहे ती बदलणे शक्य नाही, याच कारणास्तव शेतकीचे शिक्षण व औद्योगिक शिक्षण यांची सांगड घालणे आवश्यक आहे." या भूमिकेला अनुसरूनच सयाजीरावांनी पुढे संस्थानातील काही विद्यार्थ्यांना इंग्लंडच्या सिरेनस्टर येथील 'रॉयल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर'मध्ये शेतीविषयक प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले. प्रशिक्षण पूर्ण करून परतताच या विद्यार्थ्यांना सयाजीरावांनी कृषी विभागातील कामाची जबाबदारी दिली. शेती क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचा हा भारतातील पहिला प्रयत्न होता.

## शेतीविषयक ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी तरुणांना अत्याधुनिक उच्च शिक्षण देत असतानाच या 'ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण' करण्यावर सयाजीरावांनी जाणीवपूर्वक भर दिला. सयाजीरावांनी वैज्ञानिक विषयावरील मराठी ग्रंथ निर्मितीसाठी सुरू केलेल्या 'सयाजीज्ञानमंजूषा' या ग्रंथमालेत 'कृषीकर्मविद्या' हा ६००

पानांचा ग्रंथ १८९६ मध्ये प्रकाशित झाला. विविध पिकांच्या लागवडीची शास्त्रोक्त माहिती या ग्रंथात देण्यात आली होती.

खासेरावांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करणाऱ्या कृषी खात्याने १९०९ मध्ये शेती व शेतीपूरक विषयांची प्रगत माहिती देणारे ४८ पानांचे गुजराथी भाषेतील एक नियतकालिक सुरू केले. हे नियतकालिक ग्रामपंचायती, सहकारी पतपुरवठा संस्था, शेतकी संस्था, शेतकी बँका, कृषी संघटना इ. संस्थांना नियमितपणे पुरवले जाई. तसेच बडोद्यात 'वडोदरा खेतीवाडी' नावाच्या त्रैमासिकाचे मोफत वितरण करण्यात येत असे. कृषीसंबंधित विषयांवर ८ इतर पत्रके प्रकाशित केली जात होती. यापैकी ४ पत्रके 'कडी प्रांत खेडूत सभा' या कृषी संघटनेकडून मोफत वाटली जात.

एप्रिल १९१३ मध्ये कडी विभागात स्थापन करण्यात आलेली 'कडी प्रांत खेडूत सभा' ही कृषी संघटना वैशिष्ट्यपूर्ण होती. कडी विभागातील प्रत्येक तालुका स्तरावर या संघटनेचे विशेष संघटन करण्यात आले होते. १००० हून अधिक सदस्य असलेल्या या संघटनेच्या मार्गदर्शनाखाली कृषी पदवीधारकांची नेमणूक करून त्यांच्या माध्यमातून विविध ठिकाणी प्रगत यंत्रांची प्रात्यक्षिके दाखवली जात. त्याचबरोबर हे कृषी पदवीधर शेतकऱ्यांना बी-बियाणांची शास्त्रोक्त माहिती देऊन कृषिविषयक माहितीपत्रके वाटत.

बडोद्याच्या कृषी खात्याकडून मराठी भाषेतील कृषिविषयक त्रैमासिकाचे प्रकाशन केले जात होते. १९१५-१६ पासून या कृषी त्रैमासिकाच्या संपादनाचे काम सहकार खात्याकडे देण्यात आले. यावेळी त्याच्या नावात बदल करून या त्रैमासिकाचे 'कृषी व सहकार' असे नामकरण करण्यात आले. १९२७-२८ या वर्षात सहकार खात्याने शेतकऱ्यांना शेती संदर्भातील विविध विषयावरची वेळेत माहिती देण्यासाठी कृषी दिनदर्शिकेचे प्रकाशन केले. हा सयाजीरावांच्या समन्वयवादी धोरणाचा परिणाम होता.

१९३६ मध्ये सयाजीरावांच्या राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सव प्रसंगी स्थापन करण्यात आलेल्या 'हीरकमहोत्सवी ट्रस्टने' बडोद्याच्या कृषी-औद्योगिक विकासात मोलाचे योगदान दिले. या ट्रस्टमध्ये जनतेकडून गोळा झालेली रक्कम आधुनिक शेती पद्धती आणि इतर साहाय्यक उद्योगांचे शिक्षण घेण्यासाठी शेतकऱ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरूपात देण्यात आली. ग्रामीण भागातील मुलींना या निधीतून बांधकामाचेदेखील प्रशिक्षण देण्यात आले. शेती आणि उद्योग यांच्यात परस्परपूरकता जोपासण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी १९३८ मध्ये कृषी-औद्योगिक संस्थेची स्थापना केली.

सयाजीराव महाराजांच्या शेती आणि ग्रामीण विकासाच्या शिस्तबद्ध नियोजनाची झलक दाखवणारा एक उपक्रम नमुना म्हणून येथे विचारात घेता येईल. कारण या नमुन्यामुळे

महाराजांच्या धोरणातील सूक्ष्म नियोजन आणि दीर्घकालीन उपाययोजना यांचा प्रत्यय येतो. तो नमुना पुढीलप्रमाणे -

## सयाजीराव तिसरे डायमंड ज्युबिली ट्रस्ट फंड

१९३६ मध्ये सयाजीराव महाराजांच्या राज्याधिकार हीरक महोत्सवानिमित्त या फंडाची स्थापना महाराजांनी केली. समाजविकास आणि मुख्यत: आदिवासी आणि अस्पृश्य यांच्या उन्नतीसाठी एक कोटी रुपयाचा निधी महाराजांनी आपल्या खाजगी फंडातून राखून ठेवला होता. या निधीच्या व्याजातून खेड्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे उपक्रम राबवले जात होते.

## I) उद्दिष्टे

१) बडोदा संस्थानातील असा मागासलेला विभाग की ज्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विकास झालेला नाही त्याच्या विकासासाठी उपक्रम राबविणे.

२) अस्पृश्य व रानीपरंज, ठकारडा, कोळी व राबडी इ. आदिवासी जमातींच्या विकासासाठी प्रयत्न करणे.

## II) ट्रस्ट बोर्ड आणि घटना

या बोर्डची घटना १९३६-३७ मध्ये तयार करण्यात आली. या बोर्डाचे एकूण १९ सदस्य होते. त्यापैकी ११ संस्थानातील अधिकारी तर ४ जिल्हा लोकल बोर्डाचे प्रतिनिधी, २ धारा सभा प्रतिनिधी आणि २ सदस्य हे मागासवर्ग व मागास प्रदेशाचे

होते. संस्थानाचा मंत्री हा या बोर्डाचा पदसिद्ध अध्यक्ष होता तर संस्थानाचा विकास आयुक्त या बोर्डाचा सचिव होता.

## III) जिल्हा समिती

ट्रस्ट बोर्ड जिल्हा बोर्डाच्या सल्ल्याने काम करत असे. जिल्हा समिती प्रत्येक प्रांताअंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यात जिल्हा समिती स्थापन करण्यात आली होती. संस्थान आणि प्रांतपंचायत यांच्या उपक्रमांशी कोणताही विसंवाद न होता राबवता येतील असे उपक्रम तयार करण्याची जबाबदारी जिल्हा समितीवर होती. सध्या महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या जिल्हा नियोजन समिती सारखी या समितीची रचना होती.

## IV) निधी वितरणाचे सर्वसाधारण सूत्र

या फंडाचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी दीर्घकालीन कार्यक्रम आणि निधी वितरणाची व्यवस्था आवश्यक होती. या संदर्भात २३ ऑगस्ट १९३७ रोजी ट्रस्ट बोर्डाच्या मीटिंगमध्ये या फंडाच्या सर्वसाधारण धोरणाची निश्चिती झाली.

## V) जिल्हा कार्यक्रम

जिल्हा समित्यांना गावाच्या गरजांचा विचार करून दशवार्षिक विकास कार्यक्रम तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रत्येक गावात जाऊन गावकरी आणि ग्रामपंचायत यांच्याबरोबर बैठका घेऊन योजनांना गती देण्यासाठी विशेष अधिकारी नेमण्यात आला. लोकांच्या इच्छा आकांक्षा जाणून

घेणे तसेच या फंडाची धोरणे लोकांना समजून सांगणे ही या अधिकाऱ्याची जबाबदारी होती. अशा पद्धतीने जमा झालेली माहिती दशवार्षिक कार्यक्रम तयार करण्यासाठी उपयुक्त होती. प्रत्येक खेड्यातील कार्यरत असणारी ग्रामस्थांची समिती या फंडाकडून होणाऱ्या कामावर लक्ष ठेवण्याचे काम करत होती.

## VI) उत्पन्न आणि खर्च

या फंडाचे मुख्य उत्पन्न म्हणजे महाराजांनी राखून ठेवलेल्या एक कोटी रुपयांवरील व्याज होय. १९३७-३८ ही रक्कम ३ लाख ५० हजार इतकी होती. त्याअगोदरच्या वर्षातील शिल्लक ३ लाख ४२ हजार ४८३ रु. इतकी होती. त्यामध्ये पंचायती आणि लोकवर्गणी यातून ६७ हजार १२६ रु. भर पडली. त्यामुळे एकूण शिल्लक रक्कम ७ लाख ५९ हजार ६०९ रु. इतकी झाली. त्यापैकी १ लाख २१ हजार ९१० रु. १९३७-३८ मध्ये विकास कामासाठी खर्च झाले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १८ कोटी ५९ लाख ३२ हजार इतकी भरते. यावरून या फंडाच्या रचनात्मक कामाची कल्पना येते.

## VII) उपक्रमांचे स्वरूप

या फंडाच्या उपक्रमांचे वर्गीकरण तीन प्रकारात करण्यात आले.

अ) जन उपयोगाचे उपक्रम – ग्रामीण रस्ते, विहिरी इ. यासाठी बडोदा, मेहसाणा आणि नवसारी या जिल्ह्यांना प्रत्येकी ६० हजार रु. देण्यात आले. तर अमरेली जिल्ह्याला ४५ हजार रु. आणि ओखामंडल जिल्ह्यासाठी १५ हजार रु. देण्यात आले.

ब) मागासवर्ग विभाग - यामध्ये अस्पृश्य, आदिवासी इ.च्या विकासासाठी ५० हजार रु. देण्यात आले.

क) मुख्यालयातील योजना – ग्रामीण लोकसंख्येचा मोठ्या घटकासाठी ५० हजार रु. निधी देण्यात आला.

## VII) १९३७-३८ मधील मंजूर कार्यक्रम

या वर्षात २ लाख ७०५ रु. च्या विकास कामांना मंजुरी देण्यात आली. ही रक्कम संस्थानातील २११ खेड्यांवर खर्च झाली.

## VIII) कुटीर उद्योग

यामध्ये कुटीर उद्योग प्रशिक्षण संस्था व कुक्कुटपालन उद्योग यांचा समावेश होता. कुटीर उद्योग प्रशिक्षण संस्थेने स्पिनिंग अँड विव्हिंग, डाईंग आणि कलिको, प्रिंटिंग इ. चे प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले. त्याचप्रमाणे कुक्कुटपालन उद्योगासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. पहिल्या वर्षी १० शेतकऱ्यांनी कोसंबा केंद्रातून प्रशिक्षण घेऊन आपले उद्योग सुरू केले.

## IX) ग्रामीण रेडिओ केंद्र

ग्रामीण रेडिओ प्रसारण केंद्राची योजना तयार करून ती कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

## X) योजनेची अंमलबजावणी

या फंडाचा सर्व ग्रामीण लोकांना उपयोग होण्यासाठी ग्रामपंचायती आणि तत्सम सेवाभावी संस्थांचा या योजनांच्या

अंमलबजावणीमध्ये सहभाग करून घेतल्यास फायद्याचे होईल.

(टीप: वरील विश्लेषणातील निधीची रक्कम ही १९३६-३७ या एका वर्षातील आहे.)

## २) डायमंड ज्युबिली पीपल्स फंड

१९३६ मध्ये सयाजीराव महाराजांच्या राज्याधिकार हीरक महोत्सवानिमित्त या फंडाची स्थापना उस्फूर्तपणे लोकसहभागातून झाली. स्थापना वर्षी लोकसहभागातून ७ लाख रु. इतका निधी जमा करण्यात आला. या रकमेच्या व्याजातून वर्षाला २५ हजार रु. उत्पन्न मिळत असे. त्यातून शेती व शेतीपूरक व्यवसायांचे प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात येत होते. यातील ठराविक रक्कम बाजूला काढून त्यातून खादी उत्पादक संस्थांना साहाय्य दिले जात होते. १९४०-४१ मध्ये एकूण १६ संस्थांना १,७५१ रु. मदत देण्यात आली. याच वर्षी १३८ शेतकऱ्यांना शेतीसंदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यासाठी ३,९९३ रु. शिष्यवृत्ती देण्यात आली. ३० शेतकऱ्यांना संस्थानच्या प्रायोगिक शेतीकेंद्रांवर भेटीला नेऊन त्यांना प्रगत शेतीचे प्रशिक्षण दिले. ४४ विद्यार्थ्यांना ३,६७२ कुटीर उद्योग शिष्यवृत्ती देण्यात आली.

## ३) डायमंड ज्युबिली पीपल्स व्हिलेज अपलिफ्टमेंट फंड

१९३६ मध्ये सयाजीराव महाराजांच्या राज्याधिकार हीरक महोत्सवानिमित्त या फंडाची स्थापना करण्यात

आली. स्थापनावर्षी ६ लाख ५८ हजार ९८६ रु. इतका निधी लोकसहभागातून संकलित झाला. या निधीसाठीच्या कमिटीचे पदसिद्ध अध्यक्ष बडोदा संस्थानचे दिवाण होते. या समितीत संस्थानातील १ अधिकारी व ३९ सर्वसाधारण सदस्य होते. समितीने खेड्यांच्या मदतीसाठीचा दशवार्षिक कार्यक्रम तयार केला. त्यासाठी लोकसंख्येच्या निकषावर दहा विभागात संस्थानातील खेड्यांचे वर्गीकरण करण्यात आले. रस्ते, गटारे, पिण्याचे पाणी, विहिरी इ.साठी हा निधी ग्रामपंचायतींना देण्यात येत होता.

सयाजीरावांच्या राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सवानिमित्त अस्पृश्य, आदिवासी आणि ग्रामीण विकासाचा वरील नमुना अमलात आला. समकालीन भारतात या प्रयोगाशी तुलना करता येईल असा दुसरा प्रयोग सापडत नाही. पुढे २ ऑक्टोबर १९५० रोजी भारत सरकारने राबवलेला 'समुदाय विकास कार्यक्रम' वरील ट्रस्टच्या उपक्रमांचा पाठलाग करताना दिसतो.

## कृषी संशोधनाचा 'आदर्श' नमुना

२० फेब्रुवारी १९१४ रोजी बडोद्यातील सहकारी मंडळांच्या पहिल्या परिषदेत बोलताना सयाजीरावांनी परदेशातील कृषीविषयक नवीन संशोधनाच्या भारतातील उपयोगाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या भाषणात सयाजीराव म्हणतात, "शेती हा आपल्या राज्यातील मुख्य धंदा आहे. शेकडा ५५ हून अधिक लोक आज शेतीवर निर्वाह करीत आहेत. असे असूनही

शेतीची स्थिती मोठीशी समाधानकारक नाही. शेतीसंबंधी जे नवेनवे शोध जर्मनी, अमेरिका वगैरे देशांत लागत आहेत व विशेषतः ब्रिटिश हिंदुस्थानात ज्या शोधांसाठी सरकारने प्रयत्न करून यश मिळविले आहे, त्या शोधाचा लाभ आपल्याला घेता येण्यासारखा आहे.” आपल्या जनतेला जगातील सर्वोत्तम सुविधा पुरवण्याच्या ध्येयाने पछाडलेल्या सयाजीरावांनी बडोद्यात केलेले विविध कृषीविषयक प्रयोग त्यांच्या या भूमिकेचाच परिपाक होता.

शेतीच्या विकासासाठी सयाजीरावांनी शेतजमिनीच्या मातीची गुणवत्ता, मातीचे प्रकार यासंदर्भातील विविध वैज्ञानिक सर्वेक्षणे करून घेतली. कृषी उत्पादनवाढीसाठी महाराजांनी सातत्याने नवनवीन प्रयोग केले. या प्रयोगांना सैद्धांतिक ज्ञानाची जोड देण्यासाठी कृषी रसायनशास्त्र या नवीन ज्ञानशाखेची मदत सयाजीरावांनी घेतली. त्यामुळेच Agricultural Chemistry (कृषी रसायनशास्त्र) विषयाचे उच्च शिक्षण घेण्यासाठी होतकरू विद्यार्थ्यांना परदेशात पाठवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सयाजीरावांनी केले. अलीकडच्या काळात भारतात बीटापासून साखर तयार करण्यासाठी विविध प्रयोग केले जात असल्याचे आपण पाहतो. सयाजीरावांनी १०० वर्षांपूर्वी बीटापासून साखर तयार करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून दर्जेदार बीट उत्पादनासाठी कृषी रसायनशास्त्राचा आधार घेण्याचा सल्ला दिला होता. आज आधुनिक उत्पादन पद्धतीच्या वापराबाबत

कृषी क्षेत्र संभ्रमात सापडले असताना सयाजीरावांची ही दूरदृष्टी आपल्याला मार्गदर्शक ठरते.

भारतातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी परदेशी संशोधनाचा उपयोग करत असतानाच आपल्या मर्यादांचा विचार करण्याचा 'विवेक' सयाजीराव महाराजांनी जाणीवपूर्वक जोपासला. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत भारतातील कृषी आणि उद्योग क्षेत्रांचा समन्वय साधून विकास करत असताना पाश्चिमात्य देशांचे अंधानुकरण शक्य नसल्याची भूमिका मांडताना ५ मे १९०० रोजीच्या बडोद्यातील ओरसंग इरिगेशन वॉटर वर्क्सच्या उद्घाटन कार्यक्रमात सयाजीराव म्हणतात, "हिंदुस्थानला मात्र कितीही इच्छा असली तरी इंग्लडंप्रमाणे केवळ धंद्यांचा अवलंब करता येणार नाही. तथापि एकट्या शेतीच्या पायी आज आपण देशाची सर्व शक्ती सर्वस्वी जी वाहात आहोत ती परिस्थिती बदलली पाहिजे. दारिद्र्यातून वर येऊन जगातील मोठमोठ्या व्यापारी राष्ट्राच्या पंक्तीला बसणाऱ्या जर्मनी व जपान या राष्ट्रांचीच उदाहरणे आपणाला या कामी उद्बोधक होतील." २१ व्या शतकात सर्व बाजूंनी अडचणीत सापडलेल्या भारतीय कृषी क्षेत्राला सयाजीरावांची ही 'विवेकी' दृष्टीच तारू शकेल.

## बडोद्यातील कृषी खाते आणि शेतीविषयक सुधारणा

सयाजीराव महाराजांनी १८९७ मध्ये इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन परतलेल्या खासेराव जाधवांच्या नेतृत्वाखाली बडोद्यात

स्वतंत्र कृषी खात्याची स्थापना केली. या कृषी खात्याच्या माध्यमातून कृषिविषयक ज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवतानाच सयाजीरावांनी आपल्या संस्थानात शेतीविषयक विविध सुधारणादेखील घडवून आणल्या. संस्थानातील विविध देवस्थाने आणि प्रार्थनास्थळांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनींना 'बारखळी जमीन' असे संबोधले जाई. या जमिनीच्या वापराबाबत कोणत्याही प्रकारचा कर आकारण्यात येत नसे. सयाजीरावांनी या जमिनीचे वर्गीकरण करून शेतीशिवाय इतर कारणांसाठी जमिनीचा उपयोग करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना कर आकारण्यास सुरुवात केली. त्यामुळे संस्थानाच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली. भंगी समाजातील व्यक्तींना त्यांच्या कामासाठी सरकारकडून देण्यात आलेल्या जमिनींना चाकरीयात जमिनी असे संबोधले जाई. सरकारची मालकी असणाऱ्या या जमिनीतील उत्पादन भंगी समाजातील व्यक्तींना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून दिले जाई. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेनंतर सरकारी कर्मचारी असणाऱ्या भंगी व्यक्तींना नियमित वेतन मिळू लागले. त्यामुळे एकाच कामाचा दुप्पट मोबदला देण्याचा प्रकार घडू लागला. यावर उपाय म्हणून रामचंद्रराव माने-पाटलांच्या सूचनेनुसार सयाजीरावांनी भंगी समाजाच्या ताब्यातील चाकरीयात जमिनी काढून घेतल्या. शासकीय खर्चात योग्य काटकसर करत बारखळी जमिनीसारख्या धार्मिक उधळपट्टीला चाप

लावणाऱ्या सयाजीरावांची दूरदृष्टी २१ व्या शतकात जगणाऱ्या आपल्यासारख्या सुजाण नागरिकांनी समजून घेणे आवश्यक आहे.

दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात सयाजीरावांनी शेतकऱ्यांना खंबीर आधार दिला. १८९९ मध्ये दुष्काळाच्या काळात शेतसारा वसुलीसाठी कोणत्याही कठोर उपाययोजना करण्यास प्रतिबंध घालणारा हुकूम सयाजीरावांनी काढला. या काळात शेतकऱ्यांवर कोणताही दबाव न आणता उत्पन्नाची साधने उपलब्ध असणाऱ्या व जमिनीत थेट गुंतवणूक असणाऱ्या लोकानांच शेतसारा भरण्यासाठी बोलावण्याची सूचना महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना केली होती. शेतसारा भरण्यास असमर्थ असणाऱ्या व्यक्तींना शक्यतोवर कोणत्याही प्रकारची सक्ती न करण्याचा धोरणात्मक निर्णय सयाजीरावांनी घेतला. रब्बी हंगामाच्या सुरुवातीला बी-बियाणे आणि शेतीसाठी उपयुक्त वस्तूंच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना सरकारच्या वतीने तगाई देण्यासाठी महाराजांनी ५०,००० रु.ची विशेष तरतूद केली. दुष्काळाच्या काळात सयाजीरावांनी आपल्या संस्थानातील 'बळीराजा'ची घेतलेली काळजी आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'जाणतेपणा'ची आठवण करून देते.

५ फेब्रुवारी १९११ रोजी अमरेली येथील कृषी-औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणात कृषी खात्याच्या कामाचे कौतुक करताना सयाजीराव म्हणतात, "रा. शितोळे

यांनी राज्यातील शेतकी खात्याच्या कामकाजाविषयी जे सांगितले ते ऐकून मला फार संतोष झाला. शेतकी वगैरे खाती रयतेच्या सुखासाठी असतात. आपल्या देशाचा मुख्य धंदा म्हणजे शेती. शंभरापैकी ऐंशी माणसे शेतकी करतात. तेव्हा आपली सर्व मदार शेतीवर आहे. शेतकीखाते करीत असलेले प्रयत्न यशस्वी झालेले पाहून मला आनंद वाटतो आणि हा आनंद आणखी जास्त वाढेल अशीही मला आशा वाटते. शेतीची सुधारणा करण्यासंबंधी माझे विचार आजकालचे नसून त्यांना पंधरावीस वर्षे झाली आहेत. त्या वेळेपासून मी याविषयी प्रयत्न करीत आहे.”

१८९९ च्या दुष्काळात महाराजांनी आपल्या दुष्काळग्रस्त प्रांताचा स्वतः पाहणी दौरा केला. या दौऱ्यातील नोंदी १९०१ मध्ये महाराजांनी पुस्तकरूपाने प्रकाशित केल्या. त्या मुळातून वाचण्यासारख्या आहेत. या दुष्काळात महाराजांनी काढलेले ४८ आदेश त्यांच्यातील ‘मातृहृदयी’ राजाचे दर्शन घडवतात.

## १८९९ च्या दुष्काळ दौऱ्यादरम्यान सयाजीराव महाराजांनी काढलेले आदेश

१) दुष्काळी कामावर जाण्यात कमीपणा वाटणाऱ्या भूमिहीन व मालमत्ताहीन लोकांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तीस रुपयांपर्यंतची रक्कम विनातारण तगाई कर्जरूपाने देण्याचा आदेश.

२) एकनकडी व फरतानकडी या खेड्यातील दुष्काळामुळे रोजगार गमावलेल्या नागरिकांच्या उदरनिर्वाहासाठी एक लाख रुपये रकमेची तगाई देण्याचा आदेश.

३) तांब्याची प्रसिद्ध बाजारपेठ असलेल्या विसनगरमधील बेरोजगार तांबट कारागिरांना देण्यात येणारी तगाईमधील २००० रु. ची रक्कम आगाऊ देण्याचे आदेश.

४) महसुलातील वरिष्ठ अधिकारी व वहिवाटदारांना खेडीपाडी पिंजून काढून निराधार व्यक्तींना मदत करण्याची सूचना महाराजांनी केली. निराधार व्यक्तींना मदत करण्यासाठी सुभा व वहिवाटदारांना अनुक्रमे १०० व ५० रु. निधी मंजूर करण्याचा अधिकार देण्याचा आदेश. आधीचा निधी संपल्यानंतर नवीन निधी देण्याची तरतूद.

५) पाटणच्या गंगाडी तलावाच्या कामावरील शारीरिकदृष्ट्या सशक्त आणि कमजोर अशा दोन्ही प्रकारच्या मजुरांकडून कोणतीही जबाबदारी निश्चित न करता काम करून घेतले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर या मजुरांची काम करण्यास सक्षम व काम करण्याच्या स्थितीत नसलेले मजूर अशा दोन गटांत वर्गीकरण करण्याचा आदेश.

६) यातील काम करण्यास सक्षम कामगारांवरील कामाची जबाबदारी निश्चित करून मोबदल्याच्या प्रमाणात त्यांच्याकडून नीट काम करून घेण्याचे आदेश.

७) दुसऱ्या वर्गातल्या आजारी व दुर्बल कामगारांवर पाटणच्या दुष्काळी दवाखान्यात उपचार करून त्यांची तब्येत पूर्वपदावर आल्यावर अन्य ठिकाणी कोणतीही जबाबदारी न टाकता त्यांच्याकडून हलक्या स्वरूपाची कामे करून घेण्याचा आदेश. दुसऱ्या वर्गातील मजुरांना अनहिलवाडा या प्राचीन शहराच्या इतिहासावर आणि प्राचीन अवशेषांवर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने या शहराच्या अवशेषांच्या उत्खननाचे काम देण्यात आले.

८) कडी विभागातील दुष्काळविषयक कामांवरील अधिकारी-मजूर यांच्यातील अनावश्यक मैत्रीपूर्ण संबंध कमी करण्यासाठी या कामांची प्रत्येक व्यक्तीवरील जबाबदारी निश्चित करण्याचा आदेश.

९) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार मजुरी वाटपावेळी रोखपालांची उपस्थिती अनिवार्य होती. मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या दुष्काळी कामांवरील मजुरांना रोखपालांच्या मर्यादित संख्येमुळे मजुरी मिळण्यास वेळ लागत होता. या परिस्थितीत मिस्त्री व निरीक्षकांकडून ठरावीक रक्कम सुरक्षित ठेव म्हणून जमा करून घेऊन त्यांना मजुरी वाटपाचा अधिकार देण्याचा आदेश.

१०) वेतन अदा करण्यातील अनियमितता व भ्रष्टाचार रोखून पैसा थेट मजुरांच्या हाती पडावा व हजेरीपत्रके नीट भरली जावीत यासाठी विशेष निरीक्षक नेमण्याचा आदेश. पात्र निरीक्षक

तयार करण्यासाठी सुरू केलेल्या प्रशिक्षणवर्गात सैन्यातील कर्मचाऱ्यांना हजेरीपत्रकातील नोंदी ठेवण्यासंबंधीचे प्रशिक्षण देण्यात आले.

११) शारीरिकदृष्ट्या दुर्बल मजुरांचे वर्गीकरण करून वेगवेगळ्या वर्गातील मजुरांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे कामे देण्याचा वैद्यकीय अधिकाऱ्यांना आदेश.

१२) चौदा वर्षाखालील मुलांना साप्ताहिक आणि सर्व मजुरांना अमावास्या व पौर्णिमेला पाक्षिक सुट्टी देण्याचा आदेश.

१३) कडी, बडोदा आणि अमरेली या सुभ्यांतील मदतकार्य सुरू असलेल्या ठिकाणी नवजात बालके आणि विकालांगांसाठी तात्पुरत्या राहुट्या उभारण्यासाठी ४,००० रु. ची तरतूद करण्याचा आदेश.

१४) मदतकार्यातील कामगारांच्या तक्रारी आणि दौऱ्यादरम्यान महाराजांना भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याचा मंत्र्यांना आदेश.

१५) शेतसारा वसुलीसाठी कोणत्याही कठोर उपाययोजना करण्यास प्रतिबंध घालणारा आदेश.

१६) शेतकऱ्यांवर कोणताही दबाव न आणता उत्पन्नाची साधने उपलब्ध असणाऱ्या व जमिनीत थेट गुंतवणूक असणाऱ्या लोकानांच शेतसारा भरण्यासाठी बोलावण्याचा अधिकाऱ्यांना आदेश.

१७) शेतसारा भरण्यास असमर्थ असणाऱ्या व्यक्तींना शक्यतोवर कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

१८) विकलांग, शारीरिकदृष्ट्या दुर्बल, वयोवृद्ध व नवजात बालकांच्या संगोपनाची जबाबदारी संस्थानाने घेतली.

१९) रब्बी हंगामाच्या सुरुवातीला बी-बियाणे आणि शेतीसाठी उपयुक्त वस्तूंच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना तगाई देण्याचे आदेश. यासाठी ५०,००० रु.ची तरतूद.

२०) दुष्काळात मोठ्या प्रमाणावर पशुधन मृत्यू पावले. उर्वरित पशुधन वाचवण्यासाठी अर्ज केलेल्या पशुपालक शेतकऱ्यांना गवताच्या लागवडीसाठी तगाई देण्याचा आदेश.

२१) सोनगडहून आणलेल्या चारा विक्रीतील अनियमितता दूर करून कोणत्याही वशिलेबाजीशिवाय सर्व शेतकऱ्यांना योग्य किमतीत गवत मिळेल यावर वहिवाटदारांनी शिक्षक, नोधानी कामदार आणि इतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने लक्ष ठेवण्याचा आदेश.

२२) खंगा येथे अन्नछत्र उघडून सरकारी खर्चाने कामगारांच्या नवजात बालकांच्या जेवणाची व्यवस्था करण्याचा आदेश.

२३) थंडीच्या दिवसात धारी आणि कोडीनार येथील अर्धवट कपड्यात काम करणाऱ्या बेघर मजुरांना वाटण्यासाठी कपडे मागवण्याचा आदेश. यासाठी १,५०० रु.ची तरतूद.

२४) अमरेली येथील दवाखान्यातील वापरात नसलेला एक विभाग केवळ दुष्काळग्रस्तांच्या उपचारासाठी राखीव ठेवून त्याचे नियंत्रण दुष्काळ अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचा आदेश.

२५) दुष्काळ दौऱ्यावर येणाऱ्या महाराजांच्या स्वागतासाठी कुठल्याही प्रकारे पैसे खर्च करू नयेत आणि रयतेने जुन्या प्रथेप्रमाणे नजराणा देऊ नये असा आदेश सयाजीरावांनी दौरा सुरू करण्यापूर्वीच काढला होता. आदेशानंतरही प्रतिष्ठित लोकांकडून दिले गेलेले नजराणे महाराजांनी मदतकार्यासाठी दिले.

२६) अमरेली येथील संपत आलेल्या सिंचन योजनेच्या कामावरील कामगारांना आणून विश्वामित्री योजनेच्या कामावर रुजू करण्याचे आदेश.

२७) शहरातील भीक मागण्याचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने मंत्र्यांच्या सूचनेनुसार शहरांचे सौंदर्यीकरण, सांडपाण्याची व्यवस्था, तलावांची खोली वाढवणे, तलावांमध्ये भर टाकणे, रस्ते दुरुस्ती इ. कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा आदेश.

२८) परिस्थिती आणि गरजेनुसार दुष्काळी कामांवरील कामगारांची संख्या कमी करण्याचे मंत्र्यांना आदेश.

२९) बडोदा येथे अनाथालय सुरू करून दुष्काळात पालकांनी सोडून दिलेल्या आणि कोवळ्या वयातल्या अनाथ बालकांचा सांभाळ करण्याचा आदेश.

३०) महिना १२ रुपयांपेक्षा कमी पगार असणाऱ्या नागरी आणि लष्करी सेवेतील कर्मचाऱ्यांना टंचाई भत्ता देण्याचा आदेश. लष्करी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून गणवेश, इतर सरंजाम आणि घोडे यासाठी होणाऱ्या नियमित कपातीला स्थगिती देण्याचा आदेश. पुढे गावपातळीवरील सेवकांच्या मागणीनुसार त्यांनादेखील टंचाईभत्त्याचा लाभ देण्यात आला.

३१) पद्रा येथील शेतकऱ्यांच्या मदतीसाठीच्या विनंतीवरून पद्रा जिल्ह्यासाठी १५,००० रु. निधी मंजूर केल्याचा आदेश.

३२) आत्मसन्मानाच्या अतिशयोक्त कल्पनांमुळे दुष्काळी कामांवर न येणाऱ्या पेटलाड जिल्ह्यातील पाटीदार समाजाला मदत स्वरूपात काही अटींवर तगाईची रक्कम आगाऊ देण्याचा आदेश.

३३) विश्वासू अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनुसार पेटलाड रेल्वेमार्गाच्या कामावरील धेड समाजातील कामगारांचे वेतन वाढवण्याचा आणि दुर्बल व विकलांगांसाठी दुसरे छोटे काम सुरू करण्याचा आदेश.

३४) पेटलाड येथे नागरिकांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे शहरात ताबडतोब गरीबखाना सुरू करण्याचा आदेश. नागरिकांनी मागणी न करताच गरीबखाना आणि अन्नछत्रांसाठी १ हजारपेक्षा अधिक रु. ची रक्कम खानगी खात्यातून मंजूर केली.

३५) शिधा कपातीची शिक्षा झालेल्या कैद्यांचा वैद्यकीय देखरेखीचा कालावधी सामान्य परिस्थितीत दोन ते तीन आठवड्यांपेक्षा अधिक न ठेवण्याचा वैद्यकीय अधिकाऱ्यांना आदेश.

३६) गरजेनुसार गरीबखान्यातील रहिवाशांना देण्यात येणाऱ्या आहारात योग्य तो बदल करण्याचा आदेश.

३७) दुष्काळग्रस्तांना काम उपलब्ध करून देण्यासाठी कोसंबा ते वाकल या तीन मैल लांबीच्या रेल्वेमार्गाचे काम कोणत्याही सर्वेक्षणाविना सुरू करण्याचा आदेश.

३८) दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होऊन जंगली उत्पादनांपर्यंत पोहोचणे शक्य व्हावे यासाठी जंगलातील रस्ते बांधण्याचा आदेश.

३९) सोनगड विभागातील गरीबखान्याच्या खर्चासाठी १०,००० रु. मंजूर करणारा आदेश.

४०) नवसारी विभागातील दुष्काळ जाणवणाऱ्या ठिकाणी लोकांना दिलासा देणारे उपक्रम मोफत राबवण्याचा आदेश.

४१) कालीपरज आदिवासी जमातीच्या करमाफीच्या मागणीबाबत संबंधित विभागाला परिस्थिती पाहून कार्यवाही करण्याचा आदेश.

४२) नवसारी विभागात चालू असलेल्या दुष्काळी कामांमध्ये धनका, चोंधार, नाईकदास, भिल्ल आणि कोकणी जमातींसाठी कामे चालू करण्यास मंजुरी.

४३) ६,००० रुपयांपेक्षा कमी खर्चाचा कोणताही दुष्काळग्रस्तांसाठीचा उपक्रम राबवण्याचा अधिकार स्थानिक अधिकाऱ्यांना प्रदान करणारा आदेश.

४४) बांबूच्या चकत्यांपासून चटया आणि मदतकार्यासाठीच्या राहुट्या तयार करण्याच्या कामासाठी ६,००० रु. निधी मंजूर केल्याचा आदेश.

४५) सोनगड येथील लोकांसाठी तातडीने मदतकार्य सुरू करण्याचा आदेश.

४६) व्यारा आणि महुआ जिल्ह्यातील शेतकरी क्यारी (छोटे चौकोन करून) पद्धतीने शेतात पाणी अडवून जमिनीची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्नशील होते. दुष्काळी कामाच्या योजनेंतर्गत हे काम करण्यासाठी या दोन जिल्ह्यांकरता ३०,००० रु. मंजूर केल्याचा आदेश. कडी आणि बडोदा विभागाप्रमाणेच या दोन जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करण्याचे अधिकार नायब सुभा आणि वहिवाटदारांना देण्यात आले.

४७) सुभा अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार पूर्व नवसारी जिल्ह्यासाठी तगाईची आगाऊ रक्कम म्हणून ३०,००० रु. मंजूर केल्याचा आदेश. संपूर्ण राज्यातील नवीन विहिरींसाठी आधीच मंजूर केलेल्या २५,००० रुपयांच्या सर्वसाधारण निधीला जोडून ही रक्कम देण्यात आली.

४८) नवसारी जिल्ह्यातील दुष्काळात दारिद्र्याने ग्रासलेले अनेक प्रतिष्ठित लोक कौटुंबिक आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या

भावनेमुळे दुष्काळी कामांवर जात नव्हते. या लोकांची उपासमार होऊ नये आणि त्यांचा उदरनिर्वाह चालावा या हेतूने त्यांच्यासाठी १५,००० रु. तगाईची आगाऊ रक्कम देण्याचा आदेश. याशिवाय गवत खरेदीसाठी १५,००० रु.ची अतिरिक्त तगाई मंजूर केली.

## बडोद्यातील कृषी प्रदर्शने

कृषिविषयक अत्याधुनिक ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी सयाजीरावांनी कृषी प्रदर्शनांचा अत्यंत हुशारीने उपयोग करून घेतला. १८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्तीच्या समारंभावेळीच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करून सयाजीरावांनी या प्रक्रियेची पायाभरणी केली. १८८५ मध्ये नडियाद येथे भरवण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाला महाराजांनी १००० रुपयांची आर्थिक मदत केली. १९०४ मध्ये कलकत्ता येथे मांडलेल्या भूमिकेनुसार सयाजीरावांनी कृषी प्रदर्शनांमध्येदेखील शेती आणि औद्योगिक शिक्षणाची सांगड घातली.

१९१७ मध्ये बडोद्यात झालेल्या कृषी-औद्योगिक प्रदर्शनासाठी सयाजीरावांनी १२,५०० रुपयांची तरतूद केली होती. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम सुमारे ३ कोटी ६६ लाख रुपयांहून अधिक भरते. कृषी, उद्यान शास्त्र, वने, शिक्षण आणि उद्योग या पाच विभागांमध्ये या प्रदर्शनाची विभागणी करण्यात आली होती. प्रदर्शनामध्ये समाविष्ट सर्व घटकांची विस्तृत माहिती देणारे गुजराती आणि इंग्रजी

भाषेतील माहितीपत्रक प्रदर्शनाआधी प्रसिद्ध करण्यात आले. हे माहितीपत्रक संस्थानातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जिल्ह्यातील सर्व उत्पादक, कृषी व उद्योग संस्थांपर्यंत पोचवण्यात आले. सर्व भारतीयांना खुले असणारे हे प्रदर्शन पूर्णपणे मोफत होते. प्रदर्शनातील कोणत्याही स्टॉलसाठी सरकारने कर किंवा इतर शुल्क आकारले नाही. केवळ ज्या स्टॉलसाठी काही विशेष सोयी-सुविधा आवश्यक असतील त्यांनाच माफक शुल्क आकारण्यात आले. या प्रदर्शनामध्ये एकूण २९,३१८ व्यक्तींनी सहभाग नोंदवला. कृषी प्रदर्शनांच्या आयोजनाचा हा 'सयाजी पॅटर्न' आजही आपल्यासाठी आदर्शवत आहे.

## शेती-सहकार समन्वयाचे 'पथदर्शक प्रारूप'

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राने प्रयत्नपूर्वक 'सहकार चळवळीची पंढरी' म्हणून नावलौकिक कमावला. त्याच्या सुमारे ५० वर्षे आधी सयाजीरावांनी बडोद्यात सहकार चळवळीच्या माध्यमातून कृषी विकासाचे 'मॉडेल' प्रत्यक्षात राबवले होते. १८८४ मध्ये सयाजीरावांनी बडोदा संस्थानातील गणदेवी येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना शासन व शेतकऱ्यांच्या संयुक्त भांडवलावर सुरू केला. या कारखान्यात ५० टक्के भांडवल बडोदा संस्थानचे तर ५०टक्के भांडवल शेतकऱ्यांचे होते. दुर्दैवाने 'सहकार चळवळीच्या पंढरी'त हा इतिहास आजवर दुर्लक्षित राहिला.

बडोद्यात सहकार चळवळीच्या उभारणीमागील सयाजीरावांची भूमिका समजून घेण्यासाठी १९१४ मध्ये बडोदा येथील सहकारी मंडळ्यांच्या परिषदेत महाराजांनी अधिकारी वर्गाला उद्देशून केलेले भाषण उपयोगी पडते. या भाषणात महाराज म्हणतात, "जर्मनी वगैरे देशांत सहकारी चळवळ म्हणजे एक यक्षिणीची कांडी ठरून गेली आहे व तिने शेतकरीवर्गाची स्थिती कमालीची सुधारून टाकली आहे. गुणराशिनाशी असा जो दारिद्र्यदोष त्याची त्या देशातून हकालपट्टी झाली असून ज्या जागी आता सुख-समृद्धी नांदत आहे. शेतकरीवर्ग असा संतुष्ट झाल्यामुळे राष्ट्रीय सुबत्तेचा पायाच भक्कम झाला आहे." जागतिक परिप्रेक्ष्याशी तुलना करत सयाजीरावांनी बडोद्यातील सहकार चळवळीचा पाया घातला.

कृषी उत्पादन वाढीसाठी शेतीला वेळेवर पाणीपुरवठा करणे गरजेचे असते. शेतीची ही गरज ओळखून सयाजीरावांनी शेतीस वेळेत व खंड न पडता पाणीपुरवठा व्हावा यासाठी १९२९ मध्ये सहकारी पॉवर पंप संस्थांची स्थापना केली. या पॉवर पंप संस्थांनी सभासदांबरोबरच इतर खेडूतांना पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला. याचबरोबर शेतीला शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी सयाजीरावांनी बडोद्यात विहिरींच्या बांधकामाला विशेष प्रोत्साहन दिले. त्यामुळेच १९३९-४० मध्ये बडोदा संस्थानात ७१,११५ पक्क्या व १७,०१८ कच्च्या विहिरी अस्तित्वात होत्या. तसेच १९३० पासून जिल्हा स्थानिक मंडळ व कृषी विकास समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुधारित अवजारांचा पुरवठा केला गेला.

बडोद्याच्या सहकार चळवळीच्या उभारणीतील अधिकाऱ्यांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करताना सयाजीराव म्हणतात, “मुलकी खात्यांतील काही अधिकारी या चळवळीत हौसेने लक्ष घालीत असलेले पाहून मला आनंद होतो. आपली खेडी सुसंघटित व बाळसेदार झाली आणि शेतीची झाली, तर किती छान गोष्ट होईल याची त्या अधिकाऱ्यांना संपूर्ण जाणीव झालेली दिसते. शेतकरी व शेती यांची अशी सुधारणा झाली तर राज्यकारभाराचे काम बरेच सुकर होईल. इतकेच नाही तर तितक्याच महत्त्वाच्या; पण अधिक उच्च दर्जाच्या इतर सुधारणा घडवून आणण्यास सरकाराला वेळ व साधनही मिळेल. म्हणून प्रत्येक मुलकी अंमलदाराने शेतीसंबंधीच्या व्यवहारशास्त्राचा नीट अभ्यास तर करावाच; पण याशिवाय त्याने खेडेगावात आधुनिक कल्पनांचे बीजारोपणही करीत असावे, अशी माझी फार इच्छा आहे.” अधिकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे कौतुक आणि त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त करताना सयाजीरावांनी साधलेला ‘सुवर्णमध्य’ आजच्या प्रशासकांनी शिकण्यासारखा आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनात पशुधनास अनन्यसाधारण महत्त्व आहे. बडोद्यात मुबलक प्रमाणावर उपलब्ध असलेल्या दुधावर आधारित डेअरी फार्मसारखा उद्योग सयाजीरावांनी १९२५ मध्ये मकरपुरा, बडोदा येथे सुरू केला. जगभरात प्रसिद्ध असणारा अमूल हा दूध उत्पादनातील ब्रॅण्ड जेथे आहे तो

म्हैसाना जिल्ह्यातील आनंद हे ठिकाण बडोदे संस्थानातच येते. १९२७-२८ मध्ये पाद्रा तालुक्यातील गावांमध्ये दुग्ध व्यवसाय सुरू करण्याच्या हेतूने सयाजीरावांनी 'विशेष आर्थिक चौकशी समिती' नेमली. या समितीच्या अहवालानुसार बडोद्यात २७ दुभत्या जनावरांसाठीच्या संस्थांची स्थापना करण्यात आली. याचबरोबर सयाजीरावांनी बडोद्यात पशुसंवर्धन आणि शुद्ध दूध पुरवठ्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना केली. १९३०-३१ मध्ये बडोद्यात १३ दुभत्या जनावरांच्या संस्था, ४ दूध पुरवठा संस्था आणि ३ पशुसंवर्धन संस्था कार्यरत होत्या.

शेती आणि सहकार यांच्या समन्वयातूनच शेतीचा उत्कर्ष होऊ शकतो हे ओळखणारे आणि तो प्रयोग यशस्वी करणारे सयाजीराव हे भारतातील पहिले प्रशासक आहेत. या समन्वयाबद्दलची त्यांची भूमिका महाराजांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे. सहकार चळवळ व शास्त्रीय शेतीसंदर्भातील समन्वयाबद्दल बोलताना सयाजीराव महाराज म्हणतात, "शेती व सहकार यांची उन्नती हे प्रत्येक जिल्ह्याच्या लोकल बोर्डाचे कर्तव्य आहे. परंतु हे कर्तव्य क्वचितच योग्य रीतीने पाळण्यात येते. अशा महत्त्वाच्या कामाची इतकी उपेक्षा का व्हावी ते मला कळत नाही. ... प्रस्तुत संमेलनाने या मंडळीची खात्री होईलच की सहकारी चळवळ व शास्त्रीय पद्धतीची शेती हे विषय खरोखर मोठे महत्त्वाचेच आहेत. या चळवळीचे काही आर्थिक फायदे

मी सांगितलेच आहेत. ...म्हणून लोकल बोर्डाच्या मंडळींना माझे आग्रहपूर्वक सांगणे आहे की, तुम्ही या शेतकऱ्यांकरिता काढलेल्या संस्था, पेढ्यांच्या कारभारात अगत्यपूर्वक लक्ष घाला व ते कारभार यशस्वी होण्यास तुम्ही जातीनिशी व तुमच्या बोर्डामार्फत प्रयत्नांची शिकस्त करा.”

जमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होते. या पार्श्वभूमीवर शेतीच्या एकत्रीकरणातून उत्पादकता वाढवून त्याचा शेतकऱ्याला फायदा व्हावा या हेतूने १९२७ मध्ये पाच विखुरलेल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करणाऱ्या सहकारी संस्थांची निर्मिती सयाजीरावांनी केली. शेतमालाच्या अधिकच्या उत्पादनाबरोबरच शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने १९३८-३९ अखेर विखुरलेल्या शेतजमिनींचे एकत्रीकरण करणाऱ्या ७७ संस्थांची बडोद्यात कार्यरत होत्या. आज शेतीच्या तुकडीकरणामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्याची स्थिती लक्षात घेता सयाजीरावांच्या शेतजमिनी एकत्रीकरणासाठीच्या प्रयत्नांचे क्रांतिकारकत्व स्पष्ट होते.

१९१४ मध्ये बडोदा येथील सहकारी मंडळ्यांच्या परिषदेत केलेल्या भाषणामध्येच शेतकऱ्यांच्या आयुष्यातील सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करताना सयाजीराव म्हणतात, “शेतीसाठी किंवा घर कामासाठी लागणारे जिन्नस त्याला

घाऊक भावाने मिळवून देणे, शेतीसंबंधीचे नवे नवे शास्त्रीय प्रयोग त्याला माहिती व प्राप्त करून देणे, विमा पद्धतीने त्यांच्या धंद्याला स्थैर्य आणून देणे वगैरे आर्थिक फायदे सहकारी चळवळीमुळेच शेतकऱ्यांना होतात.” सहकार चळवळीचे हे सर्व फायदे बडोद्यातील शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी सयाजीराव आयुष्यभर प्रयत्न करत राहिले.

पिकांना किमान हमीभाव मिळावा यासाठी देशभरात होणारी शेतकऱ्यांची दरवर्षी होणारी आंदोलने आपण पाहतो. भुईमुगासारख्या पिकाला योग्य भाव मिळावा या हेतूने सयाजीरावांनी १९३७ मध्ये सहकारी तत्त्वावर भुईमूग खरेदी-विक्री संस्थेची स्थापना केली. भुईमूग उत्पादक शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागू नये हा या संस्थेच्या स्थापनेमागचा मुख्य हेतू होता. पहिल्याच वर्षी या संस्थेने शेतकऱ्यांकडून एकूण ३५२८ मण भुईमुगाची खरेदी केली. शेतकऱ्याच्या उत्पादनाला किमान हमी भाव मिळावा यासाठी सहकारी संस्थेची स्थापना करण्यामागील सयाजीरावांची ‘तळमळ’ आजच्या शासनकर्त्यांनी शिकण्यासारखी आहे.

## भारतीय संदर्भात बडोद्यातील कृषी सहकाराचे वेगळेपण

सयाजीरावांनी बडोद्यात उभ्या केलेल्या सहकार चळवळीचे ‘अनन्यत्व’ समजून घेण्यासाठी तिची तत्कालीन भारतात प्रगतिशील समजल्या जाणाऱ्या मुंबई आणि म्हैसूर प्रांत आणि त्रावणकोर संस्थानातील सहकार चळवळीशी तुलना

करणे आवश्यक ठरते. १९३१-३२ मध्ये बडोद्यात २४ लाख लोकसंख्येसाठी एकूण ८७१ कृषी सहकारी संस्था कार्यरत होत्या. संस्थानातील २,७५५ व्यक्तींमागे एक कृषी सहकारी संस्था असे हे प्रमाण होते. या वर्षी सर्वाधिक १२,५६० कृषी संस्था कार्यरत असलेल्या मद्रास प्रांतांमध्ये ३,७१८ व्यक्तींमागे एक कृषी सहकारी संस्था होती. हेच प्रमाण मुंबई, म्हैसूर व त्रावणकोरमध्ये अनुक्रमे ४,५२५, ३,७२० व ३,६११ व्यक्तींमागे एक कृषी सहकारी संस्था एवढे होते. कृषी सहकारी संस्थांसंदर्भातील ही आकडेवारीच सयाजीरावांच्या कृषिविषयक कार्याची 'घनता' स्पष्ट करते. महाराष्ट्रात स्वातंत्र्यानंतर क्रांतिकारक ठरलेल्या सहकार चळवळीची व कृषी-औद्योगिक धोरणाची पायाभरणी सयाजीराव महाराजांनी बडोद्यात केली होती हे दुर्दैवाने महाराष्ट्राला अज्ञात आहे.

## कृषी-औद्योगिक विकासाचा आदर्श आकृतिबंध

कृषी-औद्योगिक शिक्षणाची क्रांतिकारक सांगड घालणाऱ्या सयाजीरावांनी बडोद्यात कृषी क्षेत्रावर आधारित उद्योगांच्या विकासाचा आदर्शवत आकृतिबंध उभा केला. १८९४ मध्ये बडोदा सरकारने स्थापन केलेल्या औद्योगिक आयोगाने प्रामुख्याने नाणी पाडणाऱ्या सराफी लोकांचे विलोपन, सातत्याने राज्याच्या बाहेर पैशाचा होणारा निचरा, भांडवलाची कमतरता आणि सावकारांकडून कर्जावर आकारले जाणारे अवाजवी

व्याज या बाबींचा अभ्यास केला. या आयोगाची सूचना लक्षात घेऊन कर्जबाजारी व उच्च व्याजदराने शोषित शेतकरी जनतेला दिलासा देण्यासाठी सयाजीरावांनी कृषी बँकांची स्थापना केली. संस्थानात उद्योग उभा करण्याआधी उद्योगाला कच्चामाल पुरवणाऱ्या कृषी क्षेत्राला आर्थिक आधार पुरवण्याची दूरदृष्टी यामागे होती. आजच्या भारतीय कृषी क्षेत्राच्या स्थितीचे अवलोकन केले असता सयाजीरावांच्या या 'दृष्टी'ची आज आपल्याला सर्वाधिक गरज असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

सयाजीरावांनी १९१३ मध्ये व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सल्ला देण्यासाठी नेमलेल्या सल्लागार समितीमध्ये एकूण २२ सदस्य होते. बडोद्यात उद्भवणाऱ्या व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्रासंबंधित सर्व आर्थिक समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या सोडवणुकीसाठी बडोदा सरकारला सल्ला देणे हे या सल्लागार समितीचे मुख्य कार्य होते. १९१४ मध्ये बडोद्यात स्थापन झालेला 'श्री सयाजी आयर्न वर्क्स' हा कारखाना कृषी अवजाराच्या निर्मितीत अग्रेसर होता. या कारखान्यात विविध प्रकारची कृषी उपकरणे, लोखंडी पाईप, पाईपलाईनसाठी वापरले जाणारे व्हॉल्व्ह, रस्ते बांधण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रे, वस्त्रोद्योगांसाठी लागणारे ब्लिचिंग यंत्रे इ. ची निर्मिती करण्यात येत असे.

नैसर्गिक आपत्तींमध्ये शेतकऱ्याला खंबीर मदतीचा हात देणाऱ्या सयाजीरावांनी सहकार चळवळीचे 'मर्म' अचूक जाणले होते. या सहकार चळवळीची उद्योगाशी 'योग्य' सांगड घालत सयाजीरावांनी आपल्या संस्थानातील शेतकऱ्यांचा उत्कर्ष साधला. औद्योगिक 'आत्मनिर्भरते'चे अनावश्यक स्तोम न माजवता शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव देण्यासाठीची सयाजीरावांची 'तळमळ' आपण समजून घेतली तरच शेतकरी खऱ्या अर्थाने 'बळीराजा' म्हणून आयुष्य जगू शकेल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



### ❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com